साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १३ वे, अंक - पहिला; एप्रिल-मे-जून २०२२

UGC Care Listed Journal
ISSN 2231 - 573X

● संपादक ●
डॉ. शिवाजी हुसे
पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद - ४३११०३
मो. ९९०४००३९९८

UGC Care Listed Journal ISSN 2231 - 573X
साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

MAH MAR 34737/13/1/2009-TC

वर्ष १३ वे, अंक - पहिला; एप्रिल-मे-जून २०२२

## कुळवाडीभूषण छत्रपती शिवाजी महाराज विशेषांक

[भाग-३]

● संपादक ●

डॉ. शिवाजी हुसे

● अतिथी संपादक ●

डॉ. सर्जेराव जिगे     डॉ. यशवंत सोनुने

● संपादक मंडळ ●

डॉ. सुभाष बागल
डॉ. सुभाष शेकडे
डॉ. एकनाथ शिंदे
डॉ. ताहेर पठाण
डॉ. रामचंद्र झाडे
डॉ. दत्तात्रय डुंबरे
डॉ. राज मुसणे
डॉ. दिलीप बिरुटे
डॉ. प्रेमला मुखेडकर
डॉ. रंजना कदम
डॉ. सुखदेव इघारे

मूल्य : २५० रुपये

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे; परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड,
कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३, मो. ९९०४००३९९८

# अनुक्रमणिका



| अ. क्र. | लेखाचे शीर्षक / लेखकाचे नाव | पृ. क्र. |
|---|---|---|
| १. | छत्रपती शिवाजी महाराजांची शेती व शेतकऱ्यांविषयीची भूमिका<br>- डॉ. पी. एन. डापके | १ - ३ |
| २. | छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यापारविषयक व अर्थविषयक धोरण<br>- डॉ. एस. जी. मद्रेवार व डॉ. आर. ई. मारवाडी | ४ - ६ |
| ३. | शिवाजी महाराजांचे प्रशासन<br>- डॉ. विलास खुणे | ७ - ९ |
| ४. | छत्रपती शिवाजी महाराजांचे अर्थ नियोजन<br>- डॉ. सुभाष राठोड | १० - १३ |
| ५. | छत्रपती शिवाजी महाराजांचे अष्टप्रधान मंडळ<br>- सुवर्णा ज्ञानेश्वर हजारे | १४ - १८ |
| ६. | छत्रपती शिवाजी महाराज आणि भावनिक बुद्धिमत्ता - एक चिकित्सक अभ्यास<br>- डॉ. महेश भास्कर[#1], रुस्तुम दराडे[##2], स्मिता सातपुते[###3] | १९ - २४ |
| ७. | छ. शिवरायांच्या स्वराज्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी<br>- डॉ. वासुदेव भाऊसाहेब उगले | २५ - २७ |
| ८. | छत्रपती शिवाजी महाराज व त्यांची व्यवस्थापनशास्त्रविषयक भूमिका<br>- स्मिता सातपुते[#1] व डॉ. महेश भास्कर[##2] | २८ - ३१ |
| ९. | छत्रपती शिवाजी महाराज यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व<br>- मारोती ज. कंधारे | ३२ - ३५ |
| १०. | सभासदाची बखर : छत्रपती शिवाजी महाराजांचे समकालीन वास्तव<br>- डॉ. शिवराज कांचे | ३६ - ३९ |
| ११. | शिवकालीन कृषी व्यवस्थापन आणि विकास<br>- रुस्तुम दराडे व डॉ. महेश भास्कर | ४० - ४३ |
| १२. | छत्रपती शिवाजी महाराज : व्यक्तित्व<br>- डॉ. निवृत्ती विनायक मिसाळ | ४४ - ४६ |
| १३. | नाटककार वसंत कानेटकर यांच्या ऐतिहासिक नाटकातील शिवाजी<br>- डॉ. मीनाक्षी विठोबा भोयर | ४७ - ५४ |
| १४. | छत्रपती शिवाजी महाराज – व्यक्तिमत्त्व<br>- प्रियांका विनायक पाटील | ५५ - ५८ |
| १५. | छत्रपती शिवाजी महाराज : व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व<br>- डॉ. दत्ता उद्धव जाधव | ५९ - ६२ |

# छत्रपती शिवाजी महाराज : व्यक्तित्व

- प्रा. डॉ. निवृत्ती विनायक मिसाळ
मराठी विभागप्रमुख
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर - ४६४ ६०५



"काही माणसे जन्मजात थोर असतात. काही स्वकर्तृत्वाने ते थोरपण साध्य करतात तर काहींच्या वर लादले जाते". असे 'श्रेष्ठ' म्हणून मानलेल्या व्यक्तींचे स्थूलमानाने वर्गीकरण केले जाते. शिवाजी महाराजांची गणना पहिल्या वर्गाच्या 'थोर' व्यक्तीत केली जाते.

शालिवाहन शके शुक्लनाम संवत्सरी उत्तरायणात शिशिरऋतूमध्ये फाल्गुन वैद्य तृतीयेला रात्र शुभलग्नावर अखिल पृथ्वीवर साम्राज्य वैभव करणारे पाच ग्रह अनुकूल व उच्चीचे असताना तिने (जिजामातेने) अलौकिक पुत्ररत्नास जन्म दिला. (शिवभारत अध्याय, ६१ श्लोक २६-२८) आणि नंतर त्यांच्या लावण्याचे शरीराचे वर्णन करून पुढे असे म्हटले आहे की, 'मनुष्य देह धारण करून विष्णू अवतीर्ण झाला असता त्याच्या तेजोतिशयाने रात्रसुद्धा दिवसाप्रमाणे प्रकाशमान झाली (६:४१) आणि शिवनेरी किल्यावर या पुरुषश्रेष्ठाचा जन्म झाला म्हणून त्याचे 'शिव' असे नाव लोकांत प्रसिद्ध झाले.

शहाजीराजांनी दिलेल्या राजकारणाच्या धड्याबरोबर, जिजाऊंनी बालपणी दिलेले संस्कृतीचे धडे, समकालीन साधूसंतांचे शुभाशीर्वाद महाराजांच्या पाठीशी होते. या माता-पिता साधूसंतांच्या संस्कारामुळे अगदी लहान वयातच शिवाजीराजे सज्ञ बनले होते.

रामदासस्वामींना शिवाजी महाराजांचे संपूर्ण जीवनकार्य पाहिले होते. कारण महाराजांच्या निधनानंतर स्वराज्यावर कोसळलेले अरिष्ट आणि 'महाराष्ट्र धर्म' लयाला जातो की काय या चिंतेने व्यथित झालेले रामदास "शिवरायांचा आठवावा प्रताप, असे आवर्जून का सांगतात? "मराठा तितुका मेळवावा महाराष्ट्र राज्य करावे जिकडे तिकडे" असा रामदास आग्रह का धरतात. आपल्या 'दासबोध' या ग्रंथात उत्तमपुरुष निरूपणासंबंधीचा जो समास आहे (दशक १८ समास ६) तो शिवछत्रपतींना उद्देशूनच आहे. शिवाजीराजा म्हणजे 'देणे ईश्वराचे' असे ते म्हणतात.

सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रातील विचारी पुरुषांची मते एका जबर कल्पनेने भारून गेली होती. ती कल्पना कोणती तर महाराष्ट्र धर्माची स्थापना करणे होय. पुढे राजवाडे म्हणतात, "ही कल्पना सफल करण्याचे अवघड काम छत्रपती शिवाजी महाराजांनी केले. शिवाजी महाराजांच्या एकंदर चरित्र्याची गुरुकिल्ली हीच कल्पना होय.

ही कल्पना ध्यानात ठेवून मग शिवाजी महाराजांच्या व त्यांच्या अनुयायांच्या कृत्यांचा विचार करावा म्हणजे त्या काळी महाराष्ट्र आणि कर्नाटकात जिकडेतिकडे मराठे निष्कारण धावताना परकीय इतिहासकारांना जे दिसतात ते मनात काही विशिष्ट हेतू धरून, शिस्तवार मोहीम करत आहेत असे भासू लागतील." या विषयाची चर्चा किंवा महाराष्ट्र धर्माचा सूत्रपात पहिल्यांदा होताना आढळते आणि हे सूत्र अखेरपर्यंत कायम राहिल्याचेही दिसून येते.

**शिवाजी महाराजांचे हेरखाते (प्रशासन) -**

राज्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी हेरखाते आवश्यक असते म्हणून हेरखात्याला राज्याचे डोळे आणि कान म्हणतात. हेरखात्यामुळे राज्याचे रक्षण होते. त्याचबरोबर येणाऱ्या संकटांचे निवारण होते. याबाबत शिवाजी महाराज अतिशय दक्ष होते. हेरखात्याचे महत्त्व त्यांनी ओळखले होते. राज्याचा आत्मा हेरखात्यात असतो, याची जाणीव महाराजांना असल्याने त्यांनी हेरखात्याची निर्मिती केली होती. हेरांची निवड करताना ते स्वत: करीत असत. हेरांच्या निवडीबाबत ते अतिशय दक्ष होते. एकाच विभागातील माणसांची त्यांनी हेर म्हणून निवड केली नाही, तर विविध व्यवसायांतील अनेक माणसांची त्यांनी हेरखात्यात नेमणूक केली. असे सांगतात की शिवाजी महाराज हे स्वत: चाणाक्ष हेर होते. त्यांनी ज्या काही मोहिमा फत्ते केल्या त्या मोहिमेत ते आपली रूपे बदलत असत

महाराज जेव्हा औरंगजेबाच्या आग्र्याच्या कैदेतून निसटून ते महाराष्ट्रात यावयास निघाले यावेळी त्यांच्या पाठीमागे औरंगजेबाचे सैन्य लागले होते. कसल्याही परीस्थितीत शिवाजी महाराजांना पकडा असा कडक आदेश त्यांना औरंगजेबाने दिला होता. असे असूनही शिवाजी महाराज कित्येक दिवसांचा प्रवास करून महाराष्ट्रात पोहोचले. ते कसे पोहोचले याबाबत जेव्हा आपण विचार करतो तेव्हा आपणास स्पष्ट कळते की, आग्रा ते रायगड या प्रवासात महाराजांनी आपली विविध रूपे बदलली. अशाप्रकारे विविध वेशांतरामुळे ते महाराष्ट्रात सुखरूप येऊन पोहोचले. म्हणून असे म्हटले जाते की, कौटिल्याने आपल्या 'अर्थशास्त्र' या नावाच्या ग्रंथात हेरांसाठी गूढ पुरुष हा शब्द वापरला आहे. या दृष्टीने शिवाजी महाराज हे एक गूढ पुरुष होते.

**लष्करी प्रशासन -**

शिवाजी महाराजांनी मराठ्यांचे राज्य स्थापन केले. यासाठी त्यांचे लष्कर दल प्रबळ असे होते; कारण कोणतेही राज्य हे लष्करावर चालते. लष्कर हा राज्याचा आत्मा असतो लष्कर हे स्थानिक भागातील असल्यामुळे लष्करात दाखल होणाऱ्या लोकांना येथील भौगोलिक परिस्थितीची जाणीव असल्याने ते मुघल सत्तेशी टक्कर देण्यास समर्थ ठरले. इतकेच नव्हे तर विजापूरच्या आदिलशाही व गोवळकोंड्याची कुतुबशाही यांनाही शिवाजीराजांनी आपल्या लष्कराच्या साहाय्याने जरबेत ठेवले.

**जमीन मोजणी -**

रयतेला कसलीही तोशीष पडू नये तसेच नुकसान होऊ नये म्हणून प्रथम जमिनीच्या मोजणीचे काम हाती घेतले. यासाठी पाच हात व पाच मुठी लांबीची मोजणीची काठी निश्चित केली. या मोजणीचा जास्तीत जास्त फायदा लोकांना मिळावा म्हणून काठीच्या २० औरस-चौरस काठ्यांचा एक बिघा होत असे आणि वीस बिघ्यांचा एक आवर हात असे अशी जमीन मोजून आकारून गावची गाव चौकशी केली असे सभासद बखरीत म्हटले आहे. या काठीला 'चलती काठी' म्हणत यांचा अर्थ असा की एक काठी जमीन मोजून झाली की तीन काठी उडी घेऊन मोजणी करीत असे या कारणामुळे प्रत्येक ठिकाणी एका बिघ्यात सारखीच लांबीची जमीन असेल असे नाही. लोकांच्या सोईसाठी काही ठिकाणी गावातील एखाद्या देवळाच्या भिंतीवर मोजणीची काठी कोरून ठेवलेली असे. या मापाने गावकरी काठी तयार करीत व जमिनीची मोजणी करीत. मोजणीचे हे महत्त्वाचे कार्य गावच्या मेहतर, बलुतेदार, महार यांच्याकडे सोपविले जाई व मोजणीबाबत कोणी तक्रार केली तर त्याचा निवाडा महार मेहतरांच्या साह्याने केला जाई.

मोजणी झाल्यावर 'चकबंदी' अथवा बिघवणा म्हणजे प्रत्येकाच्या मालकीच्या जमिनीच्या तुकड्याच्या चतुःसीमा ठरवणे आणि जमिनीची 'अव्वल', 'दूम', 'सीम', 'चारहम', 'बांजट' अशी प्रतवारी निश्चित करणे इत्यादी कामे केली जात. जमिनीत कालव्याचे पाणी (पाटस्थळ) वापरले आहे का, शेतातील विहिरीचे पाणी (मोटस्थळ) याचा विचार करून 'सारा' ठरविला जाई. शिवाजीराजांनी राज्याचा हिस्सा पिकाच्या २/५ इतका ठरविला होता, असा कागदपत्रांमध्ये उल्लेख आढळतो.

शिवकाळात सारा धान्यरूपाने आणि पैशाच्या रूपाने वसूल केला जात असे; पण काही वेळा धान्य गोळा करण्याचा आपला त्रास चुकविण्यासाठी त्या धान्याची किंमत बाजारभावाने ठरवून रयतेकडून रोकड सारा रूपाने घेत. मध्ययुगात पैशाची चणचण असल्याने पैशाच्या रूपाने सारा भरणे शेतकऱ्यांना जिकिरीचे होत असे. दुसरे म्हणजे समजा कोकणचा वसूल नारळ आणि सुपारीच्या रूपाने करावा असे ठरले असेल; पण तसा तो न करता अधिकाऱ्याने पैशाच्या रूपाने तो वसूल घेतला तर 'पिकते तिथे विकत ना' या न्यायाने नारळ, सुपारीचा दर कोकणात कमीच असणार; पण वस्तूरूपाने माल वसूल केल्यास आणि तो साठा देशावर नेऊन विकला तर त्या मालाला अधिक दर येईल आणि साहेबाचा फायदा होईल. अर्थशास्त्रातील 'मागणी आणि पुरवठा' या सिद्धांताचा येथे महाराजांनी अवलंब केल्याचे आपणास दिसून येते.

अधिकाऱ्यांनी कचेरीत अथवा चावडीत बसून ही कामे करू नयेत. त्यांनी 'कष्ट करून त्याची वैयक्तिक माहिती गोळा करावी, असा आदेश महाराजांनी सरकारी आणि ग्रामाधिकाऱ्यांना दिला.' थोडक्यात ज्या शेतकऱ्याची कुवत आहे; पण काही अडचणीमुळे तो ती कामे करू शकत नाही, तर अधिकाऱ्याने त्याच्या मार्गातील अडचणी दूर करून त्याला शेती करण्यास उद्युक्त करावे, असे महाराजांनी आपल्या अधिकाऱ्यांना आदेश दिले होते.

शिवाजी महाराजांचे राज्य हे 'बहुत जनासी आधारू' असे लोकांचे राज्य होते. स्व-धर्माचा म्हणजे महाराष्ट्र धर्माचा पुरस्कार करताना त्यांनी आपल्या प्रदेशातील इतर धर्मबांधवांना

संरक्षण दिले, प्रसंगी अनुदान दिले. सर्वांना समान वागणूक दिली. जात, गोत याचा विचार न करता सर्व गुणीजनांना आपल्या राज्यात आधार दिला आणि मराठी राज्याचा सर्वांगीण विकास होण्यासाठी त्यांचा योग्य तो उपयोग करून घेतला.

शिवाजी महाराजांचे कार्य त्यांच्या राज्याचे स्वरूप आणि त्यांचा 'प्रताप का आठवावा' यासंबंधीची चर्चा अगदी शिवकालापासून आजतागायत होत राहिली आहे. यावरून त्यांचे व्यक्तिमत्त्व, कर्तृत्व आणि नेतृत्व किती संस्मरणीय आहे याची कल्पना येते.

**समारोप -**

थोडक्यात, रामदासांपासून कुसुमाग्रजांपर्यंतच्या कवींना, शिवकालापासून आजपर्यंतच्या कवींना, शिवचरित्रकारांना, समीक्षकांना नमुन्यादाखल काही उदाहरणे घेऊन प्रजेचे हित पाहणाऱ्या लोकांचे नेतृत्व करणाऱ्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाच्या या शिवरायांचे रूप सतत आठवत राहावेसे वाटावे, यातच त्या युगपुरुषाची थोरवी सामावलेली आहे.

**संदर्भ -**


१. 'महाराष्ट्र समाज आणि संस्कृती', प्र.अ. कुलकर्णी
२. 'मराठ्यांचा इतिहास (१६३०-१८१८)', डॉ. डी. सी. शहा, डॉ. एस. डी. खैरनार
३. 'मराठ्यांचे इतिहासकार (इतिहासलेखन पद्धती)', अ. रा. कुलकर्णी
४. 'इतिहासाचार्य वि. का. राजवाडे', सुरेश देशपांडे


◆◆◆◆◆

